शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.३८/२०१८

| | | |
|---|---|---|
| श्रीमती पाटील शोभा विजयकुमार | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. कोयना शिक्षण संस्था, पाटण, जि.सातारा<br>२. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पाटण, जि.सातारा | } | वि.प. |

कोयना शिक्षण संस्था, पाटण, जि. सातारा यांचेकडील शिक्षिका श्रीमती पाटील शोभा विजयकुमार अधिव्याख्याता, विषय शिक्षणशास्त्र (विज्ञान), नेमणूक दि.१६/०८/१९९० यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२०/०३/२०१७ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रारीचे स्वरूप पुढील प्रमाणे.

१. सन जानेवारी २०१५ पासून आतापर्यंतचे वेतन मिळालेले नाही.

२. दि.०१/०१/२००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करून वेतन देण्यात आलेले नाही व संस्थेने दि. १६/०२/२०१७ रोजी सेवा समाप्तीची नोटीस देताना संस्थेमार्फत थकित पगार, उपदान (ग्रॅच्यूईटी) देण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही याबाबत तक्रार

**संस्थेचा अभिप्राय :**

१. बी.एड.प्रशिक्षणार्थी संख्या कमी झालेने, अपुऱ्या निधीमुळे सहावा वेतन आयोग लागू केलेला नाही.

२. जून २०१६ पासून कर्मचारी भविष्य निर्वाह निधी हप्ते थकीत आहेत.

३. सन जानेवारी २०१५ पासूनचे थकीत वेतन देता आलेले नाही.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

महाविद्यालय कायमस्वरूपी बंद करण्यासंदर्भात विद्यापीठाच्या स्थानिक चौकशी समितीकडे सर्व शिक्षकांनी लेखी तक्रार दिलेली आहे.

**समितीची निरिक्षणे :**

सदर प्रकरणातील सर्व वस्तूस्थिती व तथ्ये जी तक्रारदार यांची नियुक्ती, त्यांना वेळोवेळी दिलेले पगार, नेमणूक व सेवासमाप्तीचा दिनांक याबाबत दोन्हीही पक्षात कोणतेही मतभेद नाहीत. संस्थेकडून ज्या ज्या रक्कमा तक्रारदार यांच्या खात्यात जमा केल्याचे प्रतिपादन संस्थेतर्फे करण्यात आले आहे त्याबद्दलही कोणतेही मतभेद नाहीत. त्यामुळे खालील वादाचे मुद्दे उपस्थित होतात.

१) तक्रारदार दि. ०१/०१/२००६ पासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती होवून पगार मिळण्यास पात्र आहेत अगर नाही. २) तक्रारदार उपदानाच्या (ग्रॅच्युईटी) रक्कमेसाठी पात्र आहेत अगर नाही.

समितीने दोन्ही मुद्यांवर साधक बाधक चर्चा करून सखोल विचार केला आहे. या प्रकरणी संस्थेने दाखल केलेल्या कागदपत्रांवरून समितीच्या असे निदर्शनास आले की, यातील तक्रारदार यांनी मे.पिठासन अधिकारीसो, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण पुणे-शिवाजी-सोलापूर विद्यापीठ, पुणे यांचेकडे अपील क्रं ११/२०१७(S) दाखल करून त्यामध्ये त्यांच्या सेवासमाप्तीच्या आदेशास आव्हान दिलेले आहे. त्यामुळे तक्रारदार यांची सेवासमाप्ती ही न्यायप्रविष्ठ बाब आहे. जोपर्यंत सेवासमाप्तीबाबत अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत तक्रारदार यांनी समितीकडे उपदानाची (ग्रॅच्युईटी) मागणी करणे हे अयोग्य असल्याने तक्रारदार यांची याबाबतची मागणी या समितीस आता तुर्तास विचारात घेता येणार नाही. तथापी सेवासमाप्तीबाबत विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण पुणे-सोलापूर-शिवाजी विद्यापीठ, पुणे यांचेकडून अंतिम आदेश झालेनंतर उपदानाची (ग्रॅच्युईटी) मागणी करणेचा तक्रारदार यांचा हक्क अबाधित राहील.

संस्थेने तक्रारदार यांना पाचवा वेतन आयोग लागू केला आहे व त्यानुसार सेवासमाप्ती दिनांकापर्यंतचे वेतन दिल्याचे व तक्रारदार यांनी ते मिळाल्याचे समितीस सांगितले. त्यामुळे तक्रारदार यांनी असे प्रतिपादन केले आहे की, मा.सर्वोच्च न्यायालयाने **CIVIL APPEAL NOS 115-116 of 2017**(Arising out of Slp (C) Nos. 26523-26524 of 2012) Secretary mahatma Gandhi mission & Another V/S Bhartiy kamgar sena and &

Others with **CIVIL APPEAL NOS. 117-118 OF 2017** (Arising out of SLP (C) Nos. 26525-26526 of 2012) **CIVIL APPEAL NOS. 119-120 OF 2017** (Arising out of SLP (C) Nos. 26519-26520 of 2012) या प्रकरणी असा निकाल दिला आहे की, ज्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू केला आहे त्यांना सहावा वेतन आयोग दि.०१/०१/२००६ पासून लागू करण्यात यावा व शिवाजी विद्यापीठाने दि.२९/१०/२००९ रोजी महाराष्ट्र शासनाचा वेतन पुर्नरचनेचा निर्णय विद्यापीठाशी सर्व संलग्न महाविद्यालयांना लागू केला आहे व हा आदेश सर्व महाविद्यालयांना लागू आहे. त्यामुळे वि.प. संस्थेस हा आदेश त्यांच्या संस्थेस लागू नाही असे म्हणता येणार नाही व उपरोक्त संदर्भित न्यायनिवाडयात मा.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे असे नमूद केले आहे की, 69 While the G.R. dated 12/08/2009 is specific in its declaration that the elaborate rules contained therein dealing with the pay scales of various orders of the teaching staff of the educational institutions mentioned therein, it does not make any distinction between aided and un-aided colleges. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद बेंच यांनी याचिका क्र. ११०९१/२०१० मध्ये कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना दि. ०१/०१/२००६ पासून ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याबाबत दिलेला निर्णय कायम झाला आहे.

तसेच मे.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. ७९७/२०१७ मध्ये त्याच निर्णयाची पुनरावृत्ती केलेली आहे. शिवाय मे. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद बेंच यांनी याचिका क्र. ५१५०/२०१३ किरण माणिकराव भुसारे व इतर विरूध्द् स्टेट ऑफ महाराष्ट्र राज्य व इतर यामध्ये दि. १५/०१/२०१८ रोजी विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना दि. ०१/०१/२००६ पासून ६ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत आदेश दिलेले आहेत असे प्रतिपादन तक्रारदार यांनी केले आहे.

संस्थेने मांडलेल्या म्हणण्यामध्ये कायदेशीर मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सदरची मागणी ही मुदतीचा कायदा १९६३ प्रमाणे मुदतबाह्य झाले आहे व त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा तसेच यामध्ये असेही प्रतिपादन केले आहे की, संस्था मुंबई धर्मादाय कायदा १९५० प्रमाणे नोंदणीकृत असल्याने ती व्यापारी अगर फायदा कमवणारी संस्था

म्हणता येणार नाही व संस्था विनाअनुदानीत तत्वावर चालविण्यात येत होती तसेच संस्थेच्या विद्यार्थी संख्येत घट झाल्याने संस्थेचे बी.एड. महाविद्यालय बंद करण्याचा निर्णय घेणे संस्थेस क्रमप्राप्त झाले व याबाबत तक्रारदार यांना दि. १६/०२/२०१७ रोजी सेवासमाप्तीची नोटीस बजावण्यात आली व त्यांची सेवा दि. २९/०४/२०१७ पासून संपुष्टात आणली गेली. त्यामुळे तक्रारदार यांनी जानेवारी २००६ पासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनफरकाची केलेली मागणी अयोग्य आहे. तसेच तोंडी प्रतिपादनात संस्था चालकाकडून असे प्रतिपादन करण्यात आले आहे की, संस्थेकडे तक्रारदार व इतरांचे देणे देणेकरीता पर्याप्त निधी उपलब्ध नाही व त्याकरीता अपुरी विद्यार्थी पटसंख्या हे कारण पुढे करण्यात आले आहे व ही वस्तुस्थितीदेखील आहे.

संस्थेतर्फे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या In the matter of Pundalik Jalam Patil v/s Executive Engineer Jalgaon Medium Project & Ors Reported in 2008 AIR (SC) (Supp) 1025. The Hon'ble Supreme Court has observed as follows (para 23).

*"23. Statutes of limitation are sometimes described as statutes of peace. An unlimited and perpetual threat of limitation creates insecurity and uncertainty; some kind of limitation is essential for public order. This court in Rajender Singh and others v. Santa Singh and others [(1973) 2 SCC 705] has observed: "the object of law of Limitation is to prevent disturbance and deprivation of what may have been acquired in equity and justice by long enjoyment of what may have been lost by a prartys own inaction negligence or laches". In Motichand v Munshi [(1979) 2 SCR 824], this court observed that this principle is based on the maxim "interest republicase ut sit finis litum, that is, the interest of the State requires that there should be end to litigation but at the same time law of limitation are a means to ensuring private justice suppressing fraud and perjury, quickening diligence and preventing oppression. It needs no restatement at our hands that the object for fixing time limit for litigation is based on public policy fixing a life span for legal remedy for the purpose of general welfare. They are ment to see that the parties do not resort to dilatory tactics but avail their legal remedies promptly. Salmond in his jurisprudence states that the laws come to the assistance of the vigilant and not of the sleepy".*

The aforesaid ratio has been refreed to by the Hon'ble Bombay High Court in the matter of Shri Shantilal Babu Patel & Anr V/S Ramakant subrao Shetye & Ors Reported in 2019 (2) All MR 279.

तथापी वरील न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता सदर प्रकरणातील मुद्द्‌ा हा भूसंपादन कायद्याखालील असून सदर प्रकरणात कलम ५ मुदतीचा कायदा १९६३ बाबत

आहे व त्याचा समितीसमोर निवाडयासाठी असलेल्या प्रकरणाशी दुरान्वये संबध नाही. करीता सदर प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयातील निर्देश या प्रकरणी लागू होत नाहीत.

वि.प. तर्फे समितीचे लक्ष मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या शांतीलाल बापू पटेल विरूध्द रमाकांत सुबराव शेटे रि.पि. ३५५/२०१७ निर्णय दि. १९/०७/२०१८ (2018 DGLS Bom.1239) वेधण्यात आले. सदर न्यायनिर्णयही कलम ५ मुदतीचा कायदा म्हणजे विलंब माफीबाबत असल्याने तो ही समितीसमोरील या प्रकरणास लागू होत नाही. या प्रकरणी तक्रारदारातर्फे **CIVIL APPEAL NOS 115-116 of 2017**(Arising out of Slp (C) Nos. 26523-26524 of 2012) Secretary mahatma Gandhi mission & Another V/S Bhartiy kamgar sena and & Others with **CIVIL APPEAL NOS. 117-118 OF 2017** (Arising out of SLP (C) Nos. 26525 of 2012) **CIVIL APPEAL NOS. 119-120 OF 2017** (Arising out of SLP (C) Nos. 26519-26520 of 2012). या न्यायनिवाडयावर भर देण्यात आला आहे. तथापी तक्रारदारातर्फे या न्यायनिवाडयातील वस्तूस्थितीकडे सोयीस्कर दुर्लक्ष करण्यात आले आहे. कारण या प्रकरणी व्यवस्थापन व कर्मचारी यांचेमध्ये पाचव्या वेतन आयोगाबदद्ल वाद निर्माण झाला होता व त्याबाबत दोन्ही पक्षात तडजोड होवून असे ठरले की, व्यवस्थापनाने असे मान्य केले की, जेंव्हा जेंव्हा राज्य सरकारच्या Under the said agreement, the management agreed to revise the pay scales from time to time in tune with the revision of the pay scales of the employees of the State. Therefore, the submission of the management in this regard is liable to be rejected on that ground alone. उपरोक्त प्रकरण व या प्रकरणात हाच सर्वात मोठ्ठा अडथळा आहे. कारण या प्रकरणी व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांमध्ये सहाव्या वेतन आयोगाबाबत कोणतीही तडजोड झालेली नाही. सदर तक्रारदार हे पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे दि. २०/०३/२०१७ पर्यंत विनाअट व विनातक्रार वेतन घेत होते. त्यांनी या प्रकरणी असा कोणताही लेखी पुरावा दाखल केलेला नाही की, त्यांनी संस्थेकडे सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे पगार देणेची मागणी केलली आहे. तथापी Secretary mahatma Gandhi mission & Another V/S Bhartiy kamgar sena and & Others with या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिवाडयाप्रमाणे सहावा वेतन आयोग विद्यापीठ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू झाला आहे. तथापी या प्रकरणी

कोणताही करार व्यवस्थापन व कर्मचाऱ्यांमध्ये झालेला नाही व ते पाचव्या वेतनआयोगाप्रमाणे जो पगार संस्था देत होती तो विनातक्रार घेत होते. त्यामुळे अगदी असे मान्य केले की, सदर तक्रारदार कर्मचाऱ्याने अर्जाचे दिनांकास सहाव्या वेतनआयोगाप्रमाणे वेतनाची मागणी केली तरीही मुदतीचा कायदा कलम ३ प्रमाणे विरूध्द् बाजूने सदरचा दावा अगर मागणी जरी मुदतबाहृय आहे असे नाही म्हटले तरीही निवाडा देण्याऱ्याला त्याबाबत निकाल देण्याचा अधिकार आहे. या प्रकरणी तक्रारदाराची मागणी मुदतबाह्य आहे त्यामुळे या समितीने मुदतीचा कायदा कलम ३ याचा सखोल विचार केला आहे व तक्रारदारास आर्टिकल ७ ची मागणी मुदतीत बसते तेवढीच देण्यात यावी असे देणे योग्य होईल, असे समितीचे मत झाले. तरीही मुदतीचा कायदा आर्टिकल ७ प्रमाणे त्यांना अर्ज दाखल दिनांकापासून मागील तीन वर्षापर्यंतच्या वेतनाच्या फरकाची रक्कम व अर्ज दिनांकाच्या पुढे वेतनाच्या फरकाची रक्कम मिळणे संयुक्तिक होईल.

**Limitation Act 1963**

| Description of suit | Period of limitation | Time from which period begins to run |
|---|---|---|
| 7. For wages in the case of any other person | Three years. | When the wages accrue due. |

उपरोक्त कायद्यातील तरतुदीप्रमाणे तक्रारदार यांना केवळ अर्ज दाखल दिनांकाच्या तीन वर्ष अगोदरची वेतन थकबाकी मुदतीत असल्यामुळे मिळू शकते व त्या आधीची वेतनफरकाची मागणी मुदतबाह्य झाल्यामुळे उपरोक्त कायद्याप्रमाणे मिळू शकत नाही व ती सदर तीन वर्षाच्या आधीचा फरक हा मुदतीच्या कायद्याप्रमाणे व तक्रारदाराने त्यांच्या हक्काबाबत वेळीच मागणी न केल्यामुळे त्यांनी ती सोडून दिली आहे (acquiscence) केल्याने त्याबाबत आदेश करणे कायदेबाह्य होईल. करीता समिती या निष्कर्षाप्रत पोहचली आहे की, संस्थेने तक्रारदार यांना दि. २०/०३/२०१७ पासून मागील तीन वर्ष अगोदर म्हणजे दि. २०/०३/२०१४ पासून सहावा वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती करून वेतनफरक व दि. २०/०३/२०१७ पासून पुढील वेतन देणे बंधकारक आहे. करीता समिती खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. तक्रारदार यांची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती होवून मिळणेची केलेली मागणी दि. २०/०३/२०१४ पासून मान्य करण्यात येत आहे. संस्थेने तक्रारदार यांची दि. २०/०३/२०१४ पासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती करून त्यांना देय वेतनाच्या फरकाचा तक्ता तयार करावा व त्यांना अदा केलेली रक्कम वजा करून फरकाची रक्कम आदेशापासून तीन महिन्यांच्या आत अदा करावी.

२. तक्रारदार यांचे सेवासमाप्तीबाबतची बाब मे.पिठासन अधिकारीसो, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण पुणे-शिवाजी-सोलापूर विद्यापीठ, पुणे यांचेसमोर प्रलंबित असलेने तक्रारदार यांची उपादान (ग्रॅच्युईटी) मिळण्याबाबतची विनंती मान्य करता येणार नाही.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 12 MAR 2021

**सदस्य**
**(श्री. आर.बी.तुपे)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ. एस.एस.महाजन)**

**सदस्य**
**(श्री. ए.ए. कुलकर्णी)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एन.बी.गायकवाड)**

**सदस्य**
**(डॉ.व्ही. डी. नांदवडेकर)**

**सदस्य सचिवा**
**(श्रीमती ए.ए.कदम)**

**अध्यक्ष**
**(श्री.एस.पी.कुलकर्णी)**